नियमित दिवाणी दावा क्र. ४३१/२०१९
CNR No. MHOS080010152019
चंद्रकांत वि. सुमनबाई

## निशाणी क्र. ५ खाली आदेश पारीत

वादीने सदरचा अर्ज हा प्रतिवादीविरुध्द दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा आदेश ३९ नियम १ अन्वये तुर्तातुर्त मनाई हुकुमासाठी दाखल केला आहे.

**वादीच्या अर्जाची थोडक्यात हकीकत अशी की** –

**०२.** वादी व प्रतिवादी हे मौजे आष्टाकासार, ता. लोहारा, जि. धाराशिव येथील रहिवाशी आहेत. मौजे आष्टाकासार, ता. लोहारा, जि. धाराशिव येथील जमीन गट क्रमांक १४२ क्षेत्र ०९ हेक्टर २७ आर ज्याची चतुःसिमा **पुर्वेस** – रस्ता नंतर अशोक देवीदास सोमवंशी, धिरज दगुडोजी पाटील, अनिल सुरेंद्र बोरगांवकर यांची शेत जमीन, **पश्चिमेस**–रस्ता, **दक्षिणेस** – पंकज एकनाथ चौधरी, राम एकनाथ चौधरी, चंद्रकांत शिवलिंगप्पा आलिशे, महादेव शिवलिंगप्पा आलिशे यांची शेत जमीन व **उत्तरेस**–राम संभाजी शिदुरे, बाळु शिदुरे, संतोष सिद्राम शिदुरे, नागनाथ बाबु शिदुरे, सुभाष शिदुरे यांची शेत जमीन, या चतुःसिमेतील जमीनीस यापुढे सोईकरीता **'दावा मिळकत'** असे संबोधण्यात येते.

**०३.** वादीचे पुढे असे कथन आहे की, दावा मिळकत ही वादीची वडिलोपार्जीत मालकी कब्जेची आहे. वादी हा पुर्वीपार १९६५ ते आजतागायत मालकी नात्याने काबीज राहुन त्याचा उपभोग घेत आहे. दावा मिळकतीशी प्रतिवादीचा काही एक संबंध नाही. प्रतिवादी ही गुंड प्रवृत्तीची असुन वादीला दावा मिळकतीतुन बेदखल करण्याच्या प्रयत्नात आहे. प्रतिवादी ही दावा मिळकतीतील उभ्या पिकाचे नुकसान करीत आहे. प्रतिवादी ही केवळ ७/१२ उता–याला तिच्या नावाची नोंद असल्याचा गैरफायदा घेऊन वादीच्या दावा मिळकतीवरील कब्जेवहिवाटीस हरकत व अडथळा करीत आहे व दावा मिळकत ही हेतुपुरस्सर विक्री करण्याच्या प्रयत्नात आहे. दिनांक ०३/१२/२०१९ रोजी वादीने

प्रतिवादीस तसे न करण्यास विनंती केली असता प्रतिवादी ऐकण्यास तयार नाही. तरी वादीस सदरचा दावा हा प्रतिवादी विरुध्द निरंतर मनाई हुकुम मिळणेसाठी दाखल करण्यास भाग पडले. शेवटी, वादीने मनाई हुकुमाचा अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**०५.** प्रतिवादी ही दाव्यात हजर झाली, परंतु तिने तिची लेखी कैफियत व म्हणणे दिले नसल्यामुळे दिनांक ०७.०२.२०२३ रोजी निशाणी क्र. १ वर दावा तिचे विरुध्द विना कैफियत व म्हणणे चालविण्यात यावा असा आदेश पारीत करण्यात आला.

**०६.** दावा व निशाणी क्र. ५ वरील कथनांचा विचार करता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निघतात, त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | सदरची केस वादीच्या बाजुने प्रथमदर्शनी आहे काय? | होय. |
| २ | न्यायाचा समतोल कोणाच्या बाजुने आहे? | वादीच्या |
| ३ | तुर्तातुर्त मनाई हुकुम मंजुर नाही केल्यास वादीचे नुकसान होणार आहे काय? | होय |
| ४ | आदेश काय? | अंतीम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**०७.** वादी यांच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. दावा, निशाणी क्र. ५ चा अर्ज आणि कागदपत्रांचे अवलोकन केले.

**०८.** तात्पुरता मनाई हुकुम अर्ज निकाली काढणेसाठी प्रथमतः वादीच्या हक्कात प्रथमदर्शनी केस आहे काय, न्यायाचा समतोल हे कोणाच्या बाजुने आहे आणि जर अर्ज नामंजुर झाल्यास वादीस नुकसान होणार आहे काय, याबाबी

पाहणे आवश्यक आहे.

**<u>मुददे क्रमांक १ ते ३ करीता</u>** –

**०९.** वरील तिन्ही मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे एकत्रीतरित्या चर्चीले आहेत.

**१०.** वादीच्या कथनांनुसार वादी व प्रतिवादी हे एकाच गावचे रहिवाशी आहेत. दावा मिळकत ही वादी याच्या वडिलोपार्जीत मालकी कब्जेची आहे. वादी हा पुर्वीपार १९६५ ते आजतागायत मालकी नात्याने काबीज राहुन त्याचा उपभोग घेत आहे. दावा मिळकतीशी प्रतिवादीचा काही एक संबंध नाही. सदर कथनांच्या पुष्टयर्थ वादीने अभिलेखावर दावा मिळकतीचा ७/१२ उतारे (नि.क्रं.८ ते १२) हा दाखल केलेले आहेत. सदर ७/१२ चे अवलोकन केले असता असे प्रथमदर्शनी दिसुन येते की, वादीच्या नावे क्षेत्र ५ हे. ६३ आर व प्रतिवादीच्या नावे क्षेत्र ३ हे. ६४ आर इतकी जमीन आहे. वादीचे असे कथन आहे की, वादी हा दावा मिळकतीचा कब्जेदार असुन सदर जमीन तो कसत आहे. वादीचे सदर कथन प्रतिवादीने खोडुन काढलेले नाही. करीता जरी वादीच्या नावे केवळ ५ हेक्टर ६३ आर जमीन असली तरी वादी हा पुर्ण ०९ हेक्टर २७ आर चा कब्जेदार असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते.

**११.** वादीच्या कथनांनुसार वादी हा दावा मिळकतीचा मालक व कबजेदार आहे. प्रतिवादी सदर प्रकरणात हजर होऊन तिची लेखी कैफियत व म्हणणे दाखल करुन सदरचे कथन खोडुन काढलेले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज हा विनाअव्हानीत राहिलेला आहे. प्रस्तुत अर्जाचे सोबत वादीने त्याचे शपथपत्र दाखल केलेले आहे. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी ही ७/१२ उता–यावर तिचे नाव असल्यामुळे दावा मिळकत ही विक्री करण्याच्या प्रयत्नात आहे. वादीचे कथन प्रतिवादीने अव्हानीत केलेले नाही. त्यामुळे वादीचे कथन अबाधीत राहिले आहे. त्यामुळे वादीच्या हक्काचे संरक्षण करणे करीता प्रतिवादी विरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकुम पारीत करणे क्रमप्राप्त आहे. वादीची केस ही प्रथमदर्शनी वादीच्या बाजुने आहे व न्यायाचा समतोल देखील वादीच्या हक्कात

आहे. जर अर्ज नामंजुर झाला तर वादीचे नुकसान होईल असे प्रथम दर्शनी दिसुन येते. करीता मी मुद्दा क्रमांक १ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवितो व खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादीने दावा मिळकत दाव्याचा निकाल लागेपर्यंत कोणासही विक्री, हस्तांतरण, गहाण, तारण व अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करु नये अशा प्रकारचा तुर्तातुर्त मनाई हुकुम देण्यात येत आहे.

३. या अर्जाचा खर्च मुळ दाव्याच्या खर्चात समाविष्ट करण्यात यावा.

सही/-

दिनांक १५/०१/२०२४.

(एस.एस. कळसकर)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, लोहारा

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word, as per the original Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : R.M. Kokare |
| Court Name | : Shri. S.S. Kalaskar, CJJD Lohara. |
| Date | : 15.01.2024 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : 15.01.2024 |
| Judgment uploaded on | : 18.01.2024 |